SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004. MAHARASHTRA
PHONE : EPABX-2609000 PGBUTR - 2609139
FAX +91-0231-2691533, 2692333 website: www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
दूरध्वनी इपीबीएक्स 260900 पी.जी.बी.यु.टी.आर. 2609139
फॅक्स +91-0231-2691533, 2692333
email :directorbcud@unishivaji.ac.in
email : pgbutr@unishivaji.ac.in

Estd : 1962
NAAC 'A' Garde
MHRD NIRF-28th Rank

संदर्भ:एस.यु/पी.जी.बी.यु.टी.आर./आविष्कार-2016-17/ 7167 दिनांक : 23 NOV 2016

प्रति,

मा. अधिविभागप्रमुख,
सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्राचार्य / संचालक,
संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय:-आविष्कार संशोधन महोत्सव 2016-17 आंतर महाविद्यालयीन/ अधिविभागीय संशोधन स्पर्धेबाबत.

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयाबाबत आपणास आदेशान्वये कळवण्यात येते की, शिवाजी विद्यापीठ अंतर्गत जिल्हास्तरीय, पदव्युत्तर स्तर व मध्यवर्ती स्तरावरील संशोधन स्पर्धा 2016-17 चे आयोजन केले आहे. त्यामध्ये आपल्या महाविद्यालयाच्या / अधिविभागाच्या विद्यार्थ्यांचा किमान एकातरी गटामध्ये सहभाग असणे अनिवार्य आहे. त्यानुसार आपण आयोजक यजमान महाविद्यालयामध्ये/अधिविभागामध्ये नोंदणी करावी. आविष्कार संशोधन महोत्सव स्पर्धासाठी नियुक्त यमजान महाविद्यालय व अधिविभाग खालीलप्रमाणे.

| यजमान महाविद्यालय | जिल्हा | स्पर्धेची तारीख | स्पर्धा प्रकार |
|---|---|---|---|
| डॉ. घाळी कॉलेज, गडहिंग्लज, कोल्हापूर. | कोल्हापूर | 26/12/2016 | 1.मानव्यशास्त्र, भाषा, ललितकला, शिक्षणशास्त्र.<br>2.वाणिज्य, व्यवस्थापन, कायदा.<br>3.मुलभुत विज्ञान.<br>4.कृषी व पशुसंवर्धन.<br>5.अभियांत्रिकी व तंत्रज्ञान.<br>6.वैद्यक व औषधनिर्माण शास्त्र. |
| भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, सांगलवाडी, सांगली. | सांगली | 27/12/2016 | |
| लालबहादूर शास्त्री कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स ॲन्ड कॉमर्स, सातारा. | सातारा | 28/12/2016 | |
| यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | पदव्युत्तर विद्यार्थी (पी.जी.), संशोधक विद्यार्थी (पी.पी.जी.) व शिक्षक कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्हा | 29/12/2016 | |
| यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | मध्यवर्ती स्पर्धा (जिल्हा पातळीवर निवड झालेल्या यु.जी.चे स्पर्धक) | 10/01/2017 | |

कळावे

आपला विश्वासू,

संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

सोबत:
1) आविष्कार स्पर्धेसाठी नियम व अटी
2) आविष्कार नाव नोंदणी अर्ज.

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## आविष्कार स्पर्धेसाठी नियम व अटी

1. शिवाजी विद्यापीठांतर्गत येणारी सर्व महाविद्यालये, मान्यताप्राप्त संस्था व अधिविभाग या संशोधन महोत्सवात सहभागी होणे बंधनकारक आहे.
2. सर्व स्पर्धेसाठी संशोधन लेख **(Research Paper)** आणि पोस्टर्स सादर करणे आवश्यक आहे. तसेच शक्य असेल त्या ठिकाणी पी.पी.टी. व मॉडेल्स सादर करावेत.
3. पोस्टर्स व मॉडेल्ससह स्पर्धकांना **Oral Presentation** साठी जास्तीत जास्त 5 मिनिटे व चर्चेसाठी 2 मिनिटे वेळ राहील.
4. उपरोक्त गटातील सर्वोत्कृष्ट तीन स्पर्धकांना अनुक्रमे रु. 1000/–, रु. 800/– आणि रु. 500/– अशी बक्षीसे प्रमाणपत्रासहित देण्यात येईल.
5. सहभागी होणा–या सर्व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात येतील.
6. प्रत्येक खालील सहा गटांमध्ये पदवी पातळीवरील प्रवेशिका निवडलेल्या विषयानुसार सहभागी होणा–या विद्यार्थी व शिक्षकांच्या नावासह यजमान महाविद्यालयांच्या प्राचार्यांकडे/ आधिविभागप्रमुख यांचेकडे सदर स्पर्धेच्या आठ (8) दिवस अगोदर पाठवावीत.
7. प्रत्येक खालील सहा गटांमध्ये पदव्युत्तर/ एम. फिल./ पी.एच.डी. करणारे विद्यार्थी / शिक्षक (पीएच.डी. नसलेले व करत असलेले) या स्तरावर प्रवेशिका निवडलेल्या विषयानुसार सहभागी होणा–या विद्यार्थी व शिक्षकांच्या नावासह तसेच अधिविभाग प्रमुखांच्या सहिसह आयोजक अधिविभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर' यांच्याकडे सदर स्पर्धेच्या आठ (8) दिवस अगोदर पाठवाव्यात.
8. सहभागी विद्यार्थ्यांसोबत एक संघ व्यवस्थापक असावा.
9. कोणत्याही शाखेचा कोणताही विद्यार्थी खालीलप्रकारांमध्ये भाग घेवू शकतो.

   अ. मानव्यशास्त्र, भाषा, अभिजात कला, शिक्षण इत्यादी **(Humanities, Languages, Fine Arts, Education, etc.)**

   ब. वाणिज्य, व्यवस्थापन, कायदा, इत्यादी **(Commerce, Management, Law, etc.)**

   क. मुलभूत विज्ञान **(Pure Science)**

   ड. शेती आणि पशुसंवर्धन **(Agriculture and Animal Husbandry)**

   इ. अभियांत्रिकी व तंत्रज्ञान **(Engineering and Technology)**

   फ. वैद्यक व औषधशास्त्र **(Medicine and Pharmacy)**
10. सदर प्रदर्शनास आवश्यक असणा–या सर्व तांत्रिक सुविधांची **(LCD, Over Head Projector, Screen, etc.)** पूर्तता यजमान महाविद्यालयांनी/अधिविभागांनी करावयाची आहे.
11. प्रदर्शनातील संशोधन प्रकल्प, पोस्टर्स, इत्यादी बाबींचे परिक्षण नियुक्त तज्ञांकडून केले जाईल व परिक्षकांचा निर्णय अंतिम राहील.
12. पोस्टर्सची साईज जास्तीत जास्त 1 मी. **x** 1 मी. व मॉडेलची साईज जास्तीत जास्त 1.5 **x** 1 मी. असणे बंधनकारक आहे.
13. स्पर्धेच्या दिवशी संबंधीत प्रदर्शनातील स्पर्धकांनी प्रकल्प मांडणी सकाळी 11.00 वा पर्यंत करणे आवश्यक आहे.

14. स्पर्धकांनी आपले वा संबंधीत महाविद्यालयाची तोंडी अथवा लेखी ओळख स्पष्ट होईल असे कोणतेही वर्तन करु नये अन्यथा त्यांचा प्रदर्शनातील सहभाग रद्द करण्यात येईल.

15. प्रवेशिका, संशोधन निबंध, सी.डी. आणि पोस्टर्स इत्यादी महाविद्यालयाच्या प्राचार्यांमार्फत / अधिप्रमुखांमार्फत यजमान महाविद्यालयाकडे / अधिविभागाकडे पाठविण्यात यावी.

16. प्रत्येक महाविद्यालयाकडून वरील सहा गटांकरिता प्रत्येकी दोन असे पदवी स्तरावरील एकूण जास्तीत जास्त बारा विद्यार्थी भाग घेवू शकतील तर पदव्युत्तर, संशोधन स्तर व शिक्षक वरील सहा गटात प्रत्येकी दोन विद्यार्थी विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेत सहभागी होवू शकतात.

17. प्रत्येक सहभागी विद्यार्थ्यांकडे संबंधीत महाविद्यालयाचे बोनाफाईड सर्टिफिकेट व ओळखपत्र असणे आवश्यक आहे व ते यजमान महाविद्यालय / अधिविभाग यांनी तपासणे आवश्यक आहे.

18. संबंधीत विद्यार्थ्यांने केलेले संशोधन व्यक्तीगत स्वरूपाचे असावे व ते प्राचार्य किंवा मार्गदर्शक यांपैकी एकाने सांक्षाकित केलेले असावे.

19. प्रवेश घेतेवेळी प्रवेशिका म्हणून स्पर्धकास आपले शोधनिबंध व **Poster Presentation** आवश्यक असून प्रकल्प सी. डी., **Powerpoint Presentation &, Model** इत्यादी स्वरूपात स्पर्धेत भाग घेता येईल. सर्व संबंधीत सहभागी विद्यार्थ्यांनी पोस्टर करणे बंधनकार आहे.

20. शोधनिबंध हा प्रात्यक्षिक, लेखी, नमुना सादरीकरण, तोंडी किंवा पोस्टर्सच्या माध्यमातून प्रदर्शित करावा.

21. विद्यार्थ्यांचा व संघव्यवस्थापक यांचा प्रवास खर्च संबंधीत महाविद्यालयाने करावयाचा आहे. यजमान महाविद्यालयाने करावायचा नाही.

22. प्रत्येक जिल्हयामधुन प्रथम व व्दितीय कमांकाचे विजेते विद्यापीठ स्तरांवरील स्पर्धेत सहभागी होतील. विद्यापीठ स्तरावरील स्पर्धेतील प्रत्येक विभागातील प्रथम दोन कमांकाचे सर्वोत्कृष्ट स्पर्धक राज्यस्तरावर विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करतील.

23. पदवीस्तरावरील स्पर्धकांनी आप—आपल्या जिल्हयांमध्येच भाग घेणे आवश्यक आहे. इतर जिल्ह्यांमध्ये भाग घेता येणार नाही.

24. जिल्हास्तर व विद्यापीठ स्तरावर निवड झालेल्या प्रथम दोन कमांकाच्या स्पर्धकांना पुढील स्तरावरील आविष्कार स्पर्धेमध्ये भाग घेणे बंधनकारक आहे.

संचालक
महाविद्यालये व विद्यापीठ
विकास मंडळ

## SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

"AVISHKAR 2016-2017"

REGISTRATION FORM

(SEPARATE ENTRY FORM SHOULD BE SENT FOR EACH SUBJECT)

Please Tickmark appropriate Category or Place

1. NAME OF THE PARTICIPANTS : -----------------------------------------------

2. LEVEL : U.G. ☐ P.G. ☐ POST P.G. (Research Scholar) ☐

TEACHER ☐

3. NAME OF COLLEGE/DEPT. : -----------------------------------------------

4. COLLEGE/DEPT. ADDRESS : -----------------------------------------------

-----------------------------------------------

- PHONE/MOBILE : -----------------------------------------------
- FAX : -----------------------------------------------
- E-MAIL : -----------------------------------------------

5. FACULTY : -----------------------------------------------

6. CATEGORY :

1. Humanities, Languages, Fine Arts, Education, etc. ☐
2. Commerce, Management, Law, etc. ☐
3. Pure Sciences ☐
4. Agriculture & Animal Husbandry ☐
5. Engineering and Technology ☐
6. Medicine and Pharmacy ☐

7. TYPE OF PRESENTATION: POSTER(Must)- ☐ MODEL- ☐ PPP- ☐

8. TITLE OF PAPER : -----------------------------------------------

-----------------------------------------------

9. FACITIES REQUIRED :

I. THE MODEL : Yes ☐ No ☐
II. ELECTRIC SUPPLY : Yes ☐ No ☐
III. L.C.D. : Yes ☐ No ☐

10. DECLARATION : ---------------------------------------------------------------- HEREBY DECLEARE THAT THE RESEARCH PAPER ENTITLED ---------------------------------------------------------------- ----------------------- IS MY OWN COUNTRIBUTION AND IS NOT SUBMITTED TO ANY OTHER COMPETATION PLACE.

11. CERTIFICATE : THIS IS TO CERTIFY THAT ---------------------------------- ---------------------------------------- IS A BONAFIDE STUDENT/TEACHER/RESEACH FELLOW OF THE COLLEGE/INSTITUTION. THE RESEARCH PAPER SUBMITTED IS HIS/HER OWN CONTRIBUTION.

NOTE:
1. A student can select any research topic in respective disiplane.
2. Please submit Research paper and soft copy on C.D.
3. Poster presentation is MUST for all entries.
4. It is compulsary to first and second rank winners to participate in successive Avishkar Event in 2016-17.

PLACE :

DATE :

SEAL OF COLLEGE/INST./DEPT.

SIGNATURE OF THE PRINCIPAL/HOD